शालार्थ प्रणालित नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र. शालार्थ १११८/प्र.क्र. ३०/१८/टीएनटी-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना :-

राज्यातील खाजगी अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच जिल्हा परिषद महानगरपालिका व नगरपालिका मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करण्याकरिता शासन निर्णय दि.७.११.२०१२ अन्वये **"शालार्थ"** संगणकीय प्रणाली लागू करण्यात आली. या संगणकीय प्रणालीत सर्व शाळांची व शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची माहिती भरण्याबाबतची कार्यपध्दती व त्याकरीता सक्षम प्राधिकारी सदर शासन निर्णयान्वये विहीत करण्यात करण्यात आले आहेत. सदर संगणकीय प्रणालीमध्ये समाविष्ट होण्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याकरीता शालार्थ क्रमांक देण्यात येतो. कर्मचाऱ्यास वैयक्तिक मान्यता प्रदान केल्यानंतर व त्यास शालार्थ क्रमांक दिल्यानंतरच सदर प्रणालीत त्या कर्मचाऱ्याची माहिती भरुन त्याचे वेतन देता येते. पूर्वी त्या त्या जिल्हयातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांच्याकडून त्यांच्या जिल्हयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ क्रमांक देण्यात येत होता. तथापि आयुक्त, शिक्षण यांनी दि.१८.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर अधिकार शिक्षण संचालक, प्राथमिक व शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक यांना प्रदान केले. शालार्थ क्रमांक देण्याचे अधिकार शिक्षण संचालकांना प्रदान केल्यामुळे शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्याकडे बऱ्याच मोठया प्रमाणावर प्रलंबित असलेले प्रस्ताव सादर करण्यात आले. या प्रक्रियेमध्ये शालार्थ क्रमांक प्रदान करण्याच्या कार्यवाहीस विलंब होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली. त्यामुळे शालार्थ प्रणालीमध्ये नव्याने नाव समाविष्ट करण्याबाबतचे प्रलंबित असलेले प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याकरीता विशेष कृती दल स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ क्रमांक देण्यासाठी खालीलप्रमाणे **"विशेष कृती दल"** स्थापन करण्यात येत आहे. :-

१) डॉ.विपीनकुमार शर्मा, आयुक्त शिक्षण	-	अध्यक्ष
२) श्री. राजु गुल्हाणे, अधीक्षक (सा.रा.से.)	-	सदस्य
३) श्री.नरेश पाटील, अधीक्षक (सा.रा.से.)	-	सदस्य
४) म.रा.क.म.वि.संघटनेने नामनिर्देशित केलेले खालील प्रतिनिधी	-	सदस्य

विभागाचे नाव	**शिक्षकाचे नाव व पत्ता**
मुंबई विभाग	१)प्रा. मुकुंद आंधळकर, २)प्रा. एस.एल.दीक्षित
पुणे विभाग	१)प्रा. शंकर तुकाराम पवार, फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे २)प्रा.संतोष एस. फासणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, येरवडा, पुणे
नाशिक विभाग	१)प्रा. संजय शिंदे, के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक २)प्रा. दिनानाथ छगन पाटील, पुज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार
अमरावती विभाग	१)प्रा. डॉ. अविनाश मधूकरराव बोर्डे, श्री.शिवाजी महाविद्यालय अकोला २)प्रा. अरविंद माधवराव भंगळे, मातोश्री विमलबाई देशमूख महाविद्यालय, अमरावती
नागपूर विभाग	१)प्रा. डॉ. अशोक गव्हाणकर, रावसाहेबत टावरे हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, नागपूर २)प्रा.अभिजित पोटले, हिस्लॉप कॉलेज, सिव्हील लाईन्स, नागपूर
औरंगाबाद विभाग	१)प्रा. विजय घोडके, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी २)प्रा. राजेंद्र पगारे, स्वामी विवेकानंद महाविद्यालय औरंगाबाद
लातूर विभाग	१)प्रा. डी.बी.जांभरुनकर, इंदिरा गांधी महाविद्यालय नांदेड २)प्रा. विलास जाधव, श्री.कुमार स्वामी महाविद्यालय, औसा, जि.लातूर
कोल्हापूर विभाग	१)प्रा. अविनाश तळेकर, गो.कृ.गोखले महाविद्यालय, कोल्हापूर २)प्रा. साहेबराव बाजीराव उमाटे, कुरुंदवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

५) श्री.राजेंद्र गोधणे, सह संचालक, - सदस्य सचिव

२. सदर विशेष कृती दलाने शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर दि.१५.०३.२०१८ पर्यत निर्णय घ्यावा. तसेच वेळोवळी नव्याने सादर होणाऱ्या प्रस्तावांवर नियमितपणे कार्यवाही करावी. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे यांनी शालार्थ क्रमांक संदर्भातील सर्व प्रस्ताव विशेष कृती दलास वर्ग करावेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२८१८१३३३७५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.03.01 12:17:19 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव
२ आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

३ शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्य), महाराष्ट्र राज्य, पुणे
४ श्री. सुनिल मगर, अध्यक्ष, ई गव्हर्नन्स सेल, पुणे
५ श्री. राजेंद्र गोधणे, सहसंचालक, आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, पुणे
६ श्री. राजु गुल्हाणे, अधिक्षक (सा.रा.से.), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे
७ श्री. नरेश पाटील, अधिक्षक (सा.रा.से.), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे
८ अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन महासंघ, मुंबई
९ विभागीय शिक्षण उप संचालक, सर्व
१० शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) सर्व
११ शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई
१२ प्रशासन अधिकारी, शिक्षण प्रमूख म.न.पा. /न.पा. सर्व
१३ अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक) सर्व
१४ सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५ निवड नस्ती, टीएनटी/३, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई